# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ ४९

दिनांक : 3 JAN 2019

प्रति,

**सर्व प्राचार्य/संचालक,**

शासकीय/अनुदानित व विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषय : **आपले सरकार महाडीबीटी-पोर्टलव्दारे योजनेचा लाभ प्राप्त करुन घेणेबाबतः २०१८-१९.**

संदर्भ : मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/२, दिनांक ०२ जानेवारी, २०१९.

उपरोक्त विषयी कळविण्यांत येते की, आपले सरकार डीबीटी-पोर्टलव्दारे सन २०१८-१९ साठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेकरीता अर्ज केलेल्या व पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे डीबीटी – पोर्टलव्दारे वितरण करण्याचे काम सुरु आहे. तंत्र शिक्षण कार्यालयाकडुन विद्यार्थ्यांचे पोर्टलमार्फत बिल जनरेट करुन व अधिदान व लेखा कार्यालयाकडून रक्कम मंजूर करुन बँकेस वितरणासाठी देण्यांत आलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीन आयडी मध्ये REDEEM (रिडीम) बटनचा पर्याय प्राप्त होतो. असा पर्याय प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी पोर्टलवरील त्यांच्या लॉगीन आयडीचा वापर करुन REDEEM (रिडीम) बटनवर क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतरच पोर्टलमार्फत त्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ घेता येईल.

तेंव्हा या बाबत नोंद घ्यावी व आपल्या संस्थेतील आपले सरकार डीबीटी-पोर्टलव्दारे सन २०१८-१९ साठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांना सदरील बाब निदर्शनास आणुन दयावी व आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांची REDEEM (रिडीम) प्रलंबित नाही याची वेळोवेळी खातरजमा करण्यात यावी.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता.